रयत शिक्षण संस्थेचे,

# सावित्रीबाई फुले महिला महाविद्याल, सातारा

## माजी विद्यार्थिनी संघ

## अहवाल २०२२-२३

---

महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासात माजी विद्यार्थिनी संघ व पालक संघ याबरोबरच समाजातील सर्व घटकांचा सहभाग महत्त्वपूर्ण असतो. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी व पालकांनी महाविद्यालयाशी सातत्याने संपर्कात रहावे व महाविद्यालयाच्या विकासासाठी मार्गदर्शन व्हावे या उद्देशाने माजी विद्यार्थिनी संघ व पालक संघाची स्थापना करण्यात आली आहे.

माजी विद्यार्थिनी संघामार्फत दरवर्षी माजी विद्यार्थिनीचे मेळावे आयोजित केले जातात. त्यामध्ये माजी विद्यार्थिनी एकत्र येणे. विचार विनिमय करणे, महाविद्यालयाच्या प्रगतीबाबत चर्चा करणे व मार्गदर्शन करणे, विविध प्रकारची मदत करणे अशा विविध विषयावर विचार मंथन होते.

गुरुवार दिनांक २० एप्रिल २०२२ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे यांच्या अध्यक्षेतेखाली महाविद्यालयात माजी विद्यार्थिनीचा मेळावा आयोजित केला होता. सदर मेळाव्यासाठी विविध क्षत्रातील व व्यवसायातील २९ विद्यार्थिनी उपस्थित होत्या. सदर मेळाव्यासाठी माजी विद्यार्थिनी संघाच्या अध्यक्षा सौ. शारदा बर्गे, सचिव सौ.प्रणीता बर्गे,खजिनदार जाधव प्रगती रामचंद्र या उपस्थित होत्या. या मेळाव्याचे प्रास्ताविक प्रा.डॉ.एस.एम.भोसले यांनी केले. तसेच महाविद्यालयाची संपूर्ण माहिती IQAC समन्वयक डॉ.आफळे जे.ए यांनी दिली. प्रि.डॉ.शिवलिंग मेनकुदळे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. तसेच संघाच्या अध्यक्षा सौ. शारदा बर्गे यांनीही आपले मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयास आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासन दिले. माजी विद्यार्थिनी मेळाव्यात सुनिता शिंदे,पल्लवी उदय पुजारी,सोनाली सुनील संकपाळ,प्रगती जाधव व साक्षी भंनगे या माजी विद्यार्थिनिनी आपले मनोगते व्यक्त केली व महाविद्यालयाच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले. मेळाव्यातील सहभागी सर्वांचे आभार प्रा.डी.आर .पवार यांनी मानले.

सदर मेळाव्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व सहकारी प्राध्यापक आणि शिक्षकेतर सेवक वर्गाचे बहुमोल सहकार्य लाभले. त्याबद्दल सर्वाचे आभार

प्रा.डॉ.शिवाजीराव एम भोसले
चेअरमन,माजी विद्यार्थिनी संघ समिति